# कंत्राटी विशेषतज्ञ पॅनल निवड जाहिरात

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सातारा जिल्हयात राबविण्यात येणा-या सर्व जिल्हा ,उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय अंतर्गत विशेषतज्ञांची पदभरती प्रक्रिया जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सातारा अंतर्गत जिल्हयामध्ये ऑनकॉल तत्वावर विविध प्रवर्गानुसार विशेषतज्ञ पॅनल निवड करावयाची आहे.

जाहिरात दिनांक - ४ /११/२०२३

<u>तक्ता अ</u>

| अ.क्र. | पदनाम | आवश्यक पदे | आवश्यक शेक्षणीक अर्हता | पॅनल | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्रीरोगत तज्ञ | 30 | MD (Gynac)/ DGO | District Panel | १. असिस्टेड डिलेव्हरी रु.१५००/-प्रती केस<br>२.मेजर सर्जरीरु. ४०००/-प्रती केस<br>३.मायनर सर्जरीरु. २०००/-प्रती केस<br>४.सोनोग्राफी रु.४००/-प्रती केस |
| २ | बालरोग तज्ञ | 29 | MD (Ped/ MBBS DCH | District Panel | १.मेजर सर्जरीरु. २०००/-प्रती केस<br>२.इर्मजन्सी ऑनकॉल बेसीसरु.१,०००/-प्रती केस |
| ३ | भूलतज्ञ | 18 | MD ((Anes)/ DA | District Panel | १. मेजर सर्जरीरु. ४०००/-प्रती केस<br>२.Stand By रु.२०००/-प्रती केस |
| ४ | भिषक | 7 | MD Medicine/ DNB | District Panel | १. इर्मजन्सीज (क्रिटिकल केसेस) रु.३,०००/-प्रती केस<br>२. इर्मजन्सी ऑनकॉल बेसीस रु.१,०००/-प्रती दिवस<br>३. प्रीॲनेस्टेटिक चेक-अप रु १,०००/-प्रती केस |
| ५ | सर्जन | 3 | MS General Surgery/ DNB | District Panel | १. मेजर सर्जरीरु. ४०००/-प्रती केस<br>२. मायनर सर्जरीरु. १०००/-प्रती केस<br>३.इर्मजन्सी ऑनकॉल बेसीस रु.१,०००/-प्रती दिवस |
| ६ | इएनटी सर्जन | 3 | MS ENT/DORL/DNB | District Panel | १. मेजर सर्जरीरु. ४०००/-प्रती केस<br>२. मायनर सर्जरीरु. १०००/-प्रती केस<br>३.इर्मजन्सी ऑनकॉल बेसीस रु.१,०००/-प्रती दिवस |
| ७ | रेडिओलॉजिस्ट | 3 | MD Radiology/DMRD | District Panel | १. सोनोग्राफी ४०० रु /-प्रती केस<br>२. एक्स रे ५० रु /-प्रती केस<br>३. सी टी स्कॅन ४०० रु /-प्रती केस |
| ८ | अस्थिरोग तज्ञ | 4 | M.S. (Ortho)/ D (Ortho) | District Panel | १. मेजर सर्जरीरु. ४०००/-प्रती केस<br>२. मायनर सर्जरीरु. १०००/-प्रती केस<br>३.इर्मजन्सी ऑनकॉल बेसीस रु.१,०००/-प्रती दिवस |

अटी व शर्ती:-

१) वरील नमूद विशेषतज्ञांचे पॅनल हे राज्य शासनाची पद नसुन निव्वळ ऑन कॉल बेसीस तत्वावर आहेत. यासाठी शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच यासाठी सेवा नियम लागु नाहीत. केंद्र/राज्य शासनाने संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

२) पॅनलमध्ये निवडीसाठी उमेदवारांनी शैक्षणीक अर्हता संबंधात पुढील कागदपत्रे सादर करावीत. :- १. डिग्री सर्टिफिकेट (MBBS) २. पदव्युत्तर सर्टिफिकेट ३. MMC नोंदणी सर्टिफिकेट व Renewal Certificate ४. जन्माचा दाखला ५. Additional Qualification बाबत MMC नोंदणी सर्टिफिकेट. ही सर्व कागतपत्रे अर्जासोबत जोडावीत. महाराष्ट्र कौन्सीलची नोंदणी (MMC Registration) असणे आवश्यक असून ती अदयावत असावी.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उमेदवारांनी ज्या पॅनल मध्ये निवड आवश्यक आहे त्यांचे नांव अर्जामध्ये नमूद करावे.

५) या संबंधितांच्या सर्व सुचना हया जिल्हा परिषद सातारा व अधिकृत संकेतस्थळावर (www.zp.satara.gov.in) प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत उमेदवारास कोणतीही वेगळी सूचना अथवा दुरध्वनी एसएमएस, ई-मेल दे[illegible] जाणार नाही. कृपया उमेदवारास नोंद घ्यावी. त्याकरीता उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य राहिल.

६) अर्जाचा नमुना हा जिल्हा परिषद सातारा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असुन सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

७) उमेदवारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास, सर्वस्वी जबाबदारी हि उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

८) वय ७० वर्षापेक्षा जास्त नसावे

९) अर्जाची हार्ड कॉपी फक्त राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय तळ मजला आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा येथे दि 22/11/२०२३ रोजीपर्यत मागविण्यात येत आहेत. तरी अर्जासोबत मुळ कागदपत्राची स्कॅन कॉपी (सुस्पष्ट असणे आवश्यक) जोडण्यात यावी.

१०) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती *11* महिन्यांकरीता असेल.

११) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पद आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकी[illegible] नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

१२) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१३) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा *Call Basis* मानधन देण्यात येईल.

१४) सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी यांची निवड झालेस सदर पदाकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१५) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व नियुक्ती ठिकाणात बदल होऊ शकतो तसेच नियुक्तीच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो, याबाबतचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सातारा यांनी राखुन ठेवले आहेत. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही. निवड प्रक्रिया संदर्भातील माहिती जिल्हा परिषद सातारा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

४०) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार Walk In Interview दवारे निवड करण्यात येईल. निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

४१) विशेषतज्ञ/अधिकारी कर्मचारी या पदांकरीता शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी या पदांकरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजु झालेला दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्ती झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवानिवृत्तीनंतर देय असलेले वेतन (पेन्शन) याबाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

४२) विशेषज्ञ व अति विशेषज्ञ पदासाठी सेवा निवृत्त अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे तसेच शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

४३) उपरोक्त पदांकरीता- तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील, अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविणेत येईल.

४४) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेस्तरावर राखिव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

४५) उमेदवारांना रु.५००/- भरती प्रक्रिया शुल्क राहिल. सदरची रक्कम पुढील खात्यावर DD अथवा चलनाव्दारे अथवा Online पध्दतीने (सोबत transaction Screenshot Print जोडणे आवश्यक) जमा करावयाची आहे. व अर्जासोबत सदर पोचपावती जोडावी.

Account name- " District Integrated Society for Health & FW Program Satara"

Account No- 60402928399

IFSC Code- MAHB0000305

Branch -Shivaji Circle, Powai Naka, Satara

४६) उमेदवारांना वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सर्व सुचना, गुणवत्ता यादी जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील.

४७) सदर जाहिराती मधील विविध विशेषतज्ञ पदासाठी उमेदवार उपलब्ध न झालेस दर महिन्याच्या चौथ्या बुधवार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्तीसाठी निवड प्रक्रिया राबविता येईल.

४८) **राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विशेषतज्ञ पदांच्या पदभरतीच्या अनुषगाने राबविणेची प्रक्रिया**

(१) **पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.**

| अ. क्र | विवरण | अधिकतम गुण |
|---|---|---|
| १ | Subject knowledge | २० गुण |
| २ | Reserch academic Knowledge | १० गुण |
| ३ | Experience -<br>A) For Govt Experience- ७ marks for one year<br>B) For private Experience- ३ marks for one year | २० गुण |

८) यानुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमांनुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. सादर यादीबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरीता एक दिवसाची मुदत देणेत येईल. आक्षेपसोबत त्यांच्या पृष्टयर्थ योग्य पुरावे सादर करण्यास सुचित करणेस सुचित करणेत येईल.

९) अशा प्रकारे प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन त्यानुसार अंतिम गुणवता यादी तयार करणेत येईल व ती जिल्हा परिषद, सातारा या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल, व त्यानुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

१०) नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख यांची राहील.

११) भरतीप्रक्रिये संदर्भातील मार्गदर्शक सुचना वेळोवळी जिल्हा परिषद, सातारा या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील, कोणत्याही उमेदवाराने जिल्हा कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधु नये.

१२) अर्जासोबत नमुद करणेत येत असलेला मोबाईल नंबर हा संपूर्ण पदभरती प्रक्रिया होईपर्यत चालु स्थितीत राहणेची दक्षता उमेदवारांनी घ्यावी. नंबर बदल्यास अथवा बंद असल्यास उदभवणा-या परिस्थितीत संबंधीत उमेदवार सर्वस्वी जबाबदार राहतील.

❖ खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात.

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
२) जन्म तारखेचा दाखला
३) पासपोर्ट आकाराचा फोटो
४) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे
५) शासकीय/निमशासकीय/खाजगी अनुभव असलेस अनुभव दाखला
६) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

| | | | |
|---|---|---|---|
| सही | सही | सही | सही |
| सदस्य | सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष निवड समिती |
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | जिल्हा शल्यचिकित्सक | जिल्हा आरोग्य अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जि. प. सातारा | जि. रु. सातारा | जि. प. सातारा | जि. प. सातारा |